N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** पठारी **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0270 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/06/2023 23:38 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 20/06/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/06/2023

**Time From (वेळेपासून):** 17:16 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/06/2023 **Time (वेळ):** 23:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 051 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/06/2023 23:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आं ेकार नगर , सुविधा मार्ट पा थरी,पा थरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शेख खदीर उर्फ बापु शेख खाजा

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तय्यब नगर, उमर फारुख मस्जीद ,पाथरी,पठारी,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तय्यब नगर, उमर फारुख मस्जीद ,पाथरी,पठारी,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9890806639

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संगिता नामदेवराव वाघमारे | | | 1. पोलीस स्टेशन पाथरी,पठारी,परभणी, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रूं. मध्ये)):** 5,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी शेख खदीर उर्फ बापु शेख खाजा वय 26 वर्श व्यवसाय इलेक्ट्रीक दुकान रा. तय्यब नगर, उमर फारुख मस्जीद पाथरी ता. पाथरी जि. परभणी मो. न. 9890806639.समक्ष पोलीस स्टेशन पाथरी येथे फिर्याद देतो की मी वरील ठिकाणचा राहणार असुन पाथरी शहरात खदिर बापु नावाचे इलेक्ट्रीक दुकान चालवुन आपली उपजिवीका भागवितो तसेच मी सामाजिक कार्य करतो. मी अन्टी करप्शन ब्युरो परभणी येथे दिनांक 20/06/2023 रोजी तक्रार दिली की, मी राहत असलेल्या घरा समोरील जायकवाडी प्रकल्पाच्या जागेत अतिक्रमण करुन काही लोक तेथे दारु विक्री करतात व काही महिला वैश्या व्यवसाय करतात, त्यामुळे माझ्या कुंटुंबाला त्याचा त्रास होत असल्याने मी मा. जिल्हाधिकारी परभणी, मा. पोलीस अधीक्षक परभणी, कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग 2 यांना पत्र देवुन अतिक्रमणा विरोधात दिनांक 01/06/2023 ते 05/06/2023 रोजी दरम्यान उपोषणाला बसणार असलेले बाबत कळविले होते. मी जायकवाडी प्रकल्पाच्या अतिक्रमणा विरोधात उपोषणाला बसु नये यासाठी जायकवाडी प्रकल्पाच्या जागेत अतिक्रमण करुन राहणा-या व अवैध वैश्या व्यवसाय करणा-या समरीन अझरोद्दीन हिच्या खोट्या तक्रारीवरुन दिनांक 28/05/2023 रोजी मझ्यावर पोलीस स्टेषन पाथरी येथे गुन्हा नंबर 214/2023 कलम 354 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यानंतर माझे तक्रारी वरुन समरीन अझरोद्दीन, अझरोद्दीन व अमीना कुरेशी तिघे राहणार पाथरी यांच्याविरोधात पोलीस स्टेशन पाथरी येथे ए.सी. कमांक 188/2023 कलम 323, 504, 34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यत आला आहे. दिनांक 31/05/2023 रोजी माझ्यावर दाखल गुन्हयाचे तपासी अमंलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांनी मला गुन्हयाच्या तपासात मदत करण्यासाठी माझा मित्र अकबर याचे समोर तीस हजार रुपयाच्या लाचेची मागणी केली त्यावेळी मी संगिता वाघमारे मडम यांना मी एवढे पैसे देवु शकत नाही अशी विनंती केल्यावर त्यांनी मला तडजोड अंती 5,000/- रुपये घेऊन येण्यासाठी सांगितले आहे, मला पोलीस स्टेषन पाथरी येथील अमंलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नाही परंतु मी त्यांना लाच दिली नाहीतर त्या माझ्यावर दाखल गुन्हयातील तपासात मला मदत करणार नाहीत या भितीपोटी मी त्यांना होकार देवुन आपल्याकडे तक्रार देण्यासाठी आलेलो आहे, माझा व अमंलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांचे सोबत यापुर्वी कोणत्याही प्रकारचा देवाण-घेवाणीचा व्यवहार नाही किंवा त्यांच्या सोबत माझी दुश्मनी नाही. मी आज दिनांक 20/06/2023 रोजी माझ्यावर दाखल झालेल्या गुन्हयाच्या संबंधाने पोलीस स्टेशन पाथरी अमंलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांना पोलीस स्टेशन पाथरी येथे भेटण्यास जाणार आहे. भेटी दरम्यान श्रीमती वाघमारे मडम यांनी मला स्वतः अगर इतरामार्फत माझ्यावर दाखल गुन्हयाच्या तपासात मदत करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती. मला हिंदी व मराठी या दोन्ही भाषेचे ज्ञान आहे. माझी तक्रार मी हिंदी व मराठीत सांगितल्याप्रमाणे संगणावर मराठीत टाईप करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे. मी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक श्री. वाघमारे एसीबी, परभणी यांनी

तात्काळ दोन पंच नामे 1) श्री मो. युनुस अन्सारी वय 52 वर्षे व्यवसाय षिपाई, समाज कल्याण कार्यालय, परभणी रा. गौरक्षण रोड, परभणी 2) श्रीमती गिता हरीभाऊ षिनगारे वय 48 वर्ष व्यवसाय वस्तीगृह अधीक्षक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी रा, नमस्कार चौक एम.जी. एम. कलेज बईज हस्टेल जवळ, नाथनगर, नांदेड यांना ए.सी.बी. कार्यालय परभणी येथे बोलावुन घेवुन त्यांची व माझी ओळख करुन दिली. त्यांना मी माझी तकार तोंडी कथन केली. माझी टंकलिखीत तकार पोनि श्री वाघमारे यांनी पंचाना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी माझी तकार वाचून त्या तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघमारे साहेबांनी ए.सी.बी. कार्यालय परभणी येथे व्हाईस रेकर्ड बाबत माहिती देवुन व्हाईस रेकर्डमध्ये वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर शासकीय वाहन क्रमांक एम.एच. 22 डी 7257 ने मी, पोलीस उप अधीक्षक श्री अशोक इप्पर, पोलीस निरीक्षक वाघमारे दोन शासकीय पंच व ए.सी.बी. स्टफ सह पाथरी करीता 14:30 वाजता रवाना झालोत. त्यानंतर पाथरी शहरा जवळील खान अब्दुल गफारखान शाळेजवळ आडोशाच्या ठिकाणी थांबलोत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री वाघमारे यांनी मला व पंचाना कार्यवाही बाबत थोडक्यात माहिती देवून सूचना दिल्या. त्यानंतर मी माझे जिजा नामे शेख हमीद शेख चंद यांना फोन करुन त्याच्या जवळील मोटार सायकल क्रमांक एम.एच. 22 जी 8022 बोलावुन घेतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक वाघामरे साहेब यांनी माझ्याकडे व्हाईस रेकर्डर चालु करुन दिल्याने मी माझा जिजाच्या मोटार सायकलने पंच क्र. श्री मो. युनुस अन्सारी यांचेसह पोलीस स्टेशन पाथरी येथील अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांची भेट घेण्यासाठी पाथरी पोलीस स्टेशन येथे गेलो. पोलीस स्टेशन पाथरी येथे अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांच्या रुमला लक असल्याने मी त्यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला त्यावेळी अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांनी मला पाथरी येथील पुजा हटेल येथे येण्यासाठी सांगितले. त्यामुळे मी व पंच क्रं. 01 मो. युनुस अन्सारी असे मोटार सायकलने पुजा हटेल येथे गेलो. त्यावेळी तेथे माझी व अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम भेट झाली. भेटी दरम्यान मी अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांना माझ्यावर पोलीस स्टेशन पाथरी येथे दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी पंच क्रमांक 01 श्री. मो. युनुस अन्सारी यांच्या समक्ष 5,000/- रुपये लाचेची मागणी केली. मी त्यांना अर्धा ते एक तासात 5,000/- रुपये अर्धा आणून देतो असे म्हणुन मी व पंच क्रमांक 01 श्री मो. युनुस अन्सारी असे ए.सी.बी. पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलोत. त्यानंतर पोनि वाघमारे, मी व दोन्ही पंच यांनी व्हाईस रेकर्डर मधील माझे व अंमलदार श्रीमत्री संगिता वाघमारे मडम यांचेतील व्हाईस रेकर्डर मध्ये रेकर्डींग झालेले संभाषण ऐकले. त्यात अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांनी मला आमच्या माझ्यावर पोलीस स्टेशन पाथरी येथे दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी 5000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांचेवर सापळा आजमाविण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर पोनि श्री वाघमारे यांचे सुचनेनुसार शासकीय वाहनात सापळा कार्यवाही सुरू केली. सापळापुर्व पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत सुचना देण्यात आल्या. पोशि/मो. जिब्राईल यांनी मला व पंचाना अथ्रसिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट लम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देवुन प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यानंतर माझ्या जवळील 5,000/- रुपये (ज्यामध्ये 5,000/- रू दराच्या 10 भारतीय चलनी नोटा) पोनि श्री वाघमारे साहेब यांचेकडे जमा केले त्यानंतर त्या लाचेच्या रकमेस पोशि/मो. जिब्राईल यांनी अथ्रसिन पावडर लावून माझे अंगावरील शर्टच्या छातीवरील उजव्या बाजूचे खिशात व्यवस्थीत ठेवून दिली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री मो. युनुस असे पोलीस स्टेशन पाथरी येथील अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम यांना लाचेची रक्कम देण्यासाठी व्हाईस रेकर्डरसह माझ्या जवळील मोटार सायकल ने पाथरी येथील पुजा हटेल येथे निघालो. पुजा हटेल येथे गेल्यानंतर अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम तेथे दिसत नसल्याने मी त्यांना त्यांच्या मोबाईलवर फाने करुन कुठे आहेत विचारले त्यावर श्रीमती संगिता मडम यांनी मला पाथरी येथील ओकांर नगर येथील सुविधा मार्ट येथे येण्यासाठी सांगितले त्यावरुन मी व पंच क्रं. 01 श्री मो. युनुस असे मोटार सायकलने ओकांर नगर येथील सुविधा मार्ट येथे गेलो. अंमलदार श्रीमती संगिता वाघमारे मडम ह्या सुविधा मार्ट मध्ये होत्या त्यांनी मला लाच मागणी केलेली रक्कम मागितली. मी त्यांना 5,000/- रुपये लाचेची रक्कम दिली. ती त्यांनी त्यांच्या अंगावरील षर्टच्या छातीवरील समोरील डाव्या बाजुचे खिशात ठेवल्याने मी सापळा पथकास दिसेल अशा रितीने पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच सापळा पथकाने श्रीमती संगिता वाघमारे मडम यांना 5,000/-- रुपये लाचेच्या रक्कमेसह सुविधा मार्ट मधुन ताब्यात घेतले व माझेकडील व्हाईस रेकर्डर 17:16 वाजता काढुन बंद केले. सदर कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आला आहे.श्रीमती संगिता नामदेवराव वाघमारे वय 45 वर्ष व्यवसाय पोलीस हवालदार 1315, पोलीस स्टेशन पाथरी जि. परभणी यांनी माझेवर पोलीस स्टेशन पाथरी येथे गुरनं 214/2023 कलम 354 अ भारतीय दंड संहीता प्रमाणे दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी आज दिनांक 20/06/2023 रोजी 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन ती 5,000/- रुपये पंच क्रमांक 01 श्री मो. युनुस अन्सारी यांच्या समक्ष आंेकार नगर येथील सुविधा मार्ट मध्ये 17:16 वाजता स्वतः स्विकारली आहे. म्हणून माझी पोलीस हवालदार श्रीमती संगिता नामदेवराव वाघमारे यांचे विरुद्ध कायदेशिर फिर्याद आहे.माझी फिर्याद माझे हिंदी व मराठीत सांगणेप्रमाणे पोलीस स्टेशन पाथरी येथील संगणकावर मराठीत टंकलिखीत केली. त्याची प्रिंट काढून मला वाचावयास दिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** budhiraj dynoba sukale(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): budhiraj dynoba sukale

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):